Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शनिवार, दि. ३० मे २०२६ । वर्ष १ । अंक ५५ । पाने २।
DIGITAL EDITION

पुणे विद्यापीठात दिगंबर जैन मुनींना प्रवेश नाकारल्याने वाद!
(पान २ वर)

## Selected

### महायुतीतील जागावाटप तिढा कायम

मुंबई : राज्यातील विधान परिषद निवडणुकीची रणधुमाळी रंगात आली असताना महायुतीतील जागावाटपाचा तिढा अद्याप कायम आहे. विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक होणार असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १ जून आहे. अर्ज दाखल करण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक असतानाही भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातील जागावाटपावर अंतिम शिक्कामोर्तब झालेले नाही. मिळालेल्या माहितीनुसार, शिवसेना शिंदे गट सहा जागांवर दावा कायम ठेवून आहे, त्यामुळे काही मतदारसंघांमध्ये दोन्ही पक्षांकडून दावेदारी सुरू असून महायुतीतील चर्चांना अद्याप अंतिम स्वरूप आलेले नाही. दरम्यान, जागावाटपाचा निर्णय प्रलंबित असतानाच सोलापूरमधून शिवसेना शिंदे गटाचे नेते रमेश बारसकर यांनी विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करून राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आणले आहे.

### बौद्ध समाजाच्या आंदोलनाला पाठिंबा; मुंबईत मोठ्या आंदोलनाची घोषणा

# चर्मकार-बौद्ध समाजाची उपवर्गीकरणाविरोधात एकजूट!

## मुंबईत महाआंदोलनाचा इशारा, आळंदीतील राज्यस्तरीय बैठकीत ठराव

जन सम्राट टाईम्स

**मुंबई/आळंदी : अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर महाराष्ट्रातील राजकारण आणि सामाजिक क्षेत्रात नवी समीकरणे आकार घेताना दिसत आहेत. राज्यातील महत्त्वाचा घटक मानल्या जाणाऱ्या चर्मकार समाजाने अखेर उपवर्गीकरणाविरोधात आपली भूमिका स्पष्ट करत बौद्ध समाजाच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला आहे.**

आळंदी येथे झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून सरकारने उपवर्गीकरणाचा निर्णय रेटल्यास मुंबईत मोठे आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. अनुसूचित जातींसाठी असलेल्या १३ टक्के आरक्षणाचे अ, ब, क आणि ड अशा वर्गांमध्ये विभाजन करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे सांगितले जात आहे. या प्रस्तावाला बौद्ध समाजाने आधीपासून विरोध दर्शविला असून मातंग समाजाकडून उपवर्गीकरणाची मागणी केली जात आहे. अशा परिस्थितीत चर्मकार समाजाची भूमिका महत्त्वाची मानली जात होती. शुक्रवारी आळंदी येथे झालेल्या राज्यव्यापी बैठकीत

चर्मकार समाजातील प्रमुख नेत्यांनी उपवर्गीकरणाला तीव्र विरोध करण्याचा ठराव मंजूर केला. बैठकीत 'बार्टी' संस्थेने तयार केलेल्या अनुसूचित जातींच्या लोकसंख्याविषयक तुलनात्मक अभ्यास अहवालावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. तसेच न्या. बदर समितीच्या शिफारशी तात्काळ जाहीर कराव्यात, अनुसूचित जातींतील प्रमुख समाजघटकांशी चर्चा करावी आणि सर्व संबंधित पक्षांना विश्वासात घेऊनच पुढील निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. बैठकीत बोलताना अनेक नेत्यांनी आरक्षणातील लाभांचे असमान वितरण, अनुसूचित जातींमधील रिक्त पदांचा अनुशेष आणि विविध विकास महामंडळांच्या योजनांचा तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात आलेले अपयश याकडे लक्ष वेधले. २०२७ च्या जनगणनेची अद्ययावत आकडेवारी समोर आल्यानंतरच उपवर्गीकरणाचा विषय विचारात घ्यावा, अशी भूमिकाही बैठकीत मांडण्यात आली. चर्मकार समाजाच्या नेत्यांनी लोकसंख्येच्या निकषांवर उपवर्गीकरण झाल्यास समाजाच्या आरक्षणातील वाट्यावर परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली. १९६१ च्या जनगणनेत चर्मकार समाजाची लोकसंख्या २३ टक्के होती, ती २०११ मध्ये १० टक्क्यांपर्यंत कशी घसरली, याचाही पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली. बैठकीला माजी समाजकल्याण मंत्री बबनराव घोलप, चर्मकार संघाचे अध्यक्ष संजय खामकर, संत रोहिदास महामंडळाचे माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर कांबळे, माजी आमदार बाबूराव माने, राष्ट्रीय चर्मकार संघाचे प्रदेशाध्यक्ष शांताराम कारंडे यांच्यासह राज्यभरातील सुमारे २०० प्रतिनिधी उपस्थित होते.

### लोकसंख्या घटली कशी

१९६१ च्या जनगणेमध्ये चर्मकार जातीची राज्यातील लोकसंख्या २३ टक्के होती. १९८१ मध्ये १८ टक्के झाली. १९९१ मध्ये १२ टक्के नोंदली गेली आणि २०११ च्या शेवटच्या जनगणनेमध्ये १० ती टक्क्यावर घसरल्याचे जनगणनेची आकडेवारी आहे. इतर जातींची लोकसंख्या वाढत असताना आमची लोकसंख्या कमी कशी झाली, यासंदर्भात चर्मकार नेत्यांचा मुख्य आक्षेप आहे.

> भारताची राज्यघटनेची अंमलबजावणी करण्यापूर्वी ८ महिने जाहीर केली होती. मग, न्या. बदर समितीच्या शिफारशी का लपवल्या जात आहेत. चर्चा झाल्याशिवाय उपवर्गीकरण करण्यास चर्मकार समाजाचा विरोध आहे.
> – **बबनराव घोलप,** माजी मंत्री व भाजपचे प्रदेश निमंत्रक.

---

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# धुळ्यात प्लास्टिकच्या गोडाऊनला भीषण आग!

## वडजाई रोड परिसरात खळबळ

जन सम्राट टाईम्स

**धुळे ।| प्रतिनिधी:** शहरातील वडजाई रोड परिसरात शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास प्लास्टिकच्या गोडाऊनला भीषण आग लागल्याची घटना घडली. आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून गोडाऊनमधील मोठ्या प्रमाणावरील साहित्य जळून खाक झाले आहे. या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वडजाई रोडवरील व्हीआयपी लॉन्ससमोरील प्लास्टिकच्या गोडाऊनमधून अचानक धूर आणि आगीचे लोळ उसळू लागले. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केल्याने परिसरातील नागरिकांमध्ये घबराट पसरली. घटनेची माहिती मिळताच अनेक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली, तर काहींनी अग्निशामक दलाला तातडीने कळविले. माहिती मिळताच धुळे महानगरपालिकेचे अग्निशामक दल घटनास्थळी दाखल झाले. चार अग्निशमन बंबांच्या सहाय्याने जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. त्यामुळे

आग आजूबाजूच्या परिसरात पसरण्याचा धोका टळला आणि मोठा अनर्थ टाळण्यात यश आले.

### संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू

गोडाऊनमधील मोठ्या प्रमाणातील प्लास्टिक साहित्य जळून खाक झाले होते. मालकाचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही. दरम्यान, आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. शॉर्टसर्किट, तांत्रिक बिघाड किंवा अन्य कारणांचा तपास केला जात असल्याची माहिती मिळाली आहे.

---

# पुणे विषारी दारू प्रकरणात मोठी कारवाई; तीन पोलिस अधिकाऱ्यांचे निलंबन

## पोलिस आयुक्तांचा कठोर निर्णय; निष्काळजीपणा आणि कर्तव्यातील हलगर्जीपणाचा ठपका

जन सम्राट टाईम्स

**पुणे | प्रतिनिधी:** राज्याला हादरवून सोडणाऱ्या पुणे, पिंपरी-चिंचवड आणि हडपसर परिसरातील विषारी दारू प्रकरणात पोलिस प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. या दुर्दैवी घटनेत १२ हून अधिक जणांचा मृत्यू झाल्यानंतर पुणे शहर पोलिस दलातील तीन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी संबंधित आदेश जारी केले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवडमधील फुगेवाडी परिसरात विषारी दारू सेवनामुळे सुरुवातीला आठ जणांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली होती. त्यानंतर हडपसर परिसरात आणखी पाच जणांचा मृत्यू झाल्याचे उघड झाल्याने एकूण मृतांचा आकडा १२ पेक्षा अधिक झाला. या घटनेमुळे राज्यभरात खळबळ उडाली असून अवैध दारू विक्रीच्या प्रश्नावर पुन्हा एकदा गंभीर चर्चा सुरू झाली आहे. या प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत आठ आरोपींना अटक केली आहे. तपासादरम्यान अवैध दारू विक्रीबाबत माहिती असूनही प्रभावी कारवाई करण्यात संबंधित अधिकाऱ्यांनी कुचराई केल्याचे समोर आल्याने त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे. निलंबित करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये हडपसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय मोगले, हडपसर पोलीस चौकीच्या प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक हसीना शिकलगार आणि गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक हसन मुलाणी यांचा समावेश आहे. पोलिस आयुक्तांनी दिलेल्या आदेशात संबंधित अधिकाऱ्यांवर कर्तव्यातील हलगर्जीपणा, निष्काळजीपणा आणि अवैध दारूविरोधात प्रभावी कारवाई करण्यात अपयश आल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. तसेच या घटनेमुळे पोलिस दलाच्या प्रतिमेला धक्का बसल्याचेही नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, या प्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यात विविध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून विषारी दारूच्या उत्पादन, पुरवठा आणि विक्रीच्या संपूर्ण साखळीचा तपास सुरू आहे. कुटुंबीयांना न्याय मिळावा आणि दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी सर्व स्तरांतून होत आहे. या घटनेनंतर राज्यभरातील अवैध दारू व्यवसायावर व्यापक मोहीम राबविण्याच्या हालचाली सुरू झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

---

# शिरपूर तालुक्यात 'जनसंघर्ष यात्रे'चा रणसंग्राम

## २१ गावांमध्ये नागरिकांच्या प्रश्नांना दिला आवाज

जन सम्राट टाईम्स

**शिरपूर । प्रतिनिधी :** तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि विविध शासकीय योजनांतील त्रुटी प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी शिरपूर फर्स्टच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य जनसंघर्ष यात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. २३ मे ते २८ मे या कालावधीत पार पडलेल्या या यात्रेद्वारे तब्बल २१ गावांमध्ये जाऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. या यात्रेचा शुभारंभ २३ मे रोजी खर्दे येथील दत्त मंदिरापासून झाला होता. तर २८ मे रोजी शिरपूर शहरातील बौद्धवाडा चौक येथे यात्रेचा समारोप करण्यात आला. सहा दिवसांच्या या दौऱ्यात शिरपूर फर्स्टच्या पदाधिकाऱ्यांनी गावागावात जाऊन शेतकरी, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यात्रेदरम्यान गेल्या तीन वर्षांत शिरपूर फर्स्टने केलेल्या विविध आंदोलनांची, निवेदनांची आणि जनहिताच्या लढ्यांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी उभारलेले आंदोलन, रस्त्यांसाठी केलेला संघर्ष, शैक्षणिक सुविधा आणि विविध सामाजिक प्रश्नांवर केलेल्या प्रयत्नांचा आढावा नागरिकांसमोर मांडण्यात आला. गावभेटीदरम्यान रेशन वितरणातील अडचणी, लाडकी बहीण योजनेतील

लाभार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्या, ज्येष्ठ नागरिकांच्या योजनांमधील त्रुटी आणि मूलभूत सुविधांचा अभाव याबाबत अनेक तक्रारी समोर आल्या. अनेक गावांमध्ये रस्ते, गटारी आणि इतर नागरी सुविधांची दुरवस्था असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणून दिले. या प्रश्नांसाठी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून नागरिकांना न्याय मिळवून देण्याचा निर्धार शिरपूर फर्स्टच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. यात्रेदरम्यान शेतकऱ्यांशी संवाद साधताना कापूस लागवडीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाय-१ (Y1) बियाण्यांच्या वाढीव किमतींचा मुद्दाही समोर आला.तसेच लाडकी बहीण योजनेतील अनेक पात्र महिलांच्या खात्यात अनुदान जमा झाले नसल्याच्या तक्रारीही विविध गावांतून पुढे आल्या. या लाभार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आगामी काळात व्यापक लढा उभारला जाईल, असेही शिरपूर फर्स्टच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. यात्रेदरम्यान गावागावात नागरिकांनी उत्स्फूर्त स्वागत केले. महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिरपूर फर्स्टच्या कार्याला पाठिंबा दर्शविला.

---

# खडसे पिता-कन्येला दिलासा!

## ॲट्रॉसिटी प्रकरणात अटकपूर्व जामीन मंजूर

जन सम्राट टाईम्स

**बोदवड | प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यात राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगलेल्या बोदवड येथील जमीन व्यवहार आणि ॲट्रॉसिटी प्रकरणात आमदार एकनाथराव खडसे आणि त्यांच्या कन्या शारदा खडसे यांना भुसावळ येथील जिल्हा व सत्र न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. बोदवड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार करणे आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्ह्यात न्यायालयाने दोघांचाही अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणाची सुरुवात ३० मार्च २०२६ रोजी झाली होती. बोदवड येथील ८२ वर्षीय चमेलीबाई तुकाराम तायडे यांनी एकनाथराव खडसे आणि शारदा खडसे यांच्याविरुद्ध गंभीर आरोप करत पोलिसांत तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, त्यांची महार इनाम वतन जमीन तापी पूर्णा साखर कारखान्यासाठी खरेदी केली जात असल्याचे सांगण्यात आले होते. तसेच कुटुंबातील सदस्यांना रोजगाराचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात जमीन कारखान्याच्या नावावर न करता शारदा खडसे यांच्या नावावर खरेदी करण्यात आली आणि योग्य मोबदला देण्यात आला नसल्याचा आरोप करण्यात आला होता. तक्रारीत आणखी एक गंभीर आरोप करण्यात आला होता. दुय्यम निबंधक कार्यालयात शारदा खडसे उपस्थित नसतानाही मूळ खरेदीखतात खाडाखोड करून बनावट दस्तऐवज तयार करण्यात आल्याचा दावा फिर्यादींकडून करण्यात आला होता. या

तक्रारीवरून बोदवड पोलिसांनी अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३(१)(एफ), ३(१)(जी) तसेच भारतीय न्याय संहिता (BNS) मधील फसवणूक, विश्वासघात आणि बनावट कागदपत्रांशी संबंधित विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला होता.

### जोरदार युक्तिवाद

गुन्हा दाखल झाल्यानंतर अटकेची शक्यता लक्षात घेऊन एकनाथराव खडसे आणि शारदा खडसे यांनी २९ एप्रिल २०२६ रोजी भुसावळ जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. सत्र न्यायाधीश एस. टी. सूर यांच्या न्यायालयात २८ मे रोजी या अर्जावर अंतिम सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान दोन्ही बाजूंच्या वकिलांनी सविस्तर आणि जोरदार युक्तिवाद मांडला. अखेर न्यायालयाने सर्व बाजूंचा विचार करून एकनाथराव खडसे आणि शारदा खडसे यांना प्रत्येकी २५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर अटकपूर्व जामीन मंजूर केला. या हायप्रोफाईल प्रकरणात खडसे यांच्यातर्फे ॲड. अकिल इस्माईल आणि ॲड. हरुल देवरे यांनी बाजू मांडली. शारदा खडसे यांच्या वतीने ॲड. अतुल सूर्यवंशी आणि ॲड. गजानन पाटील यांनी युक्तिवाद केला.

---

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# बाल कीर्तनकार ज्ञानेश्वर माऊलींच्या कीर्तनाने हजारो भाविक मंत्रमुग्ध

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अभिष्टचिंतनानिमित्त स्त्री सन्मानाचा प्रभावी जागर

जन सम्राट टाईम्स

**पाळधी/धरणगाव/जळगाव | प्रतिनिधी :** पालकमंत्री मा. ना. गुलाबराव पाटील यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त श्रीक्षेत्र पाळधी येथे जीपीएस ग्रुप व युवा नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील व विक्रम पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित भव्य अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहात भक्ती, अध्यात्म आणि समाजप्रबोधनाचा अद्वितीय संगम अनुभवायला मिळत आहे. सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी अवघ्या ११ वर्षीय बाल कीर्तनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज जाऊरकर यांनी आपल्या ओजस्वी, रसाळ आणि प्रभावी कीर्तनातून हजारो भाविकांना मंत्रमुग्ध करत स्त्री सन्मानाचा जागर घडविला. "२०२७ मध्ये नाशिक येथे कुंभमेळा भरणार आहे; मात्र भगवंताच्या भक्तांचा कुंभमेळा आज पाळधीत भरला आहे," असे गौरवोद्गार काढत ज्ञानेश्वर माऊली महाराजांनी संत साहित्य, अभंग आणि हरिनामाच्या माध्यमातून समाजाला संस्कारांची दिशा दिली. "मुलींचा वीट धरू नका, कन्या सर्वश्रेष्ठ आहे; स्त्री ही पूजनीय आणि वंदनीय आहे," असे मार्मिक प्रतिपादन करत त्यांनी स्त्री सन्मानाचा प्रभावी संदेश दिला. त्यांच्या या हृदयस्पर्शी विचारांना उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली. कीर्तनादरम्यान सादर झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथेवरील पोवाड्याने वातावरण भारावून गेले. यावेळी प्रतापराव पाटील यांनी भक्तिभावाने ठेका धरत उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. त्यांच्या या सहभागाचे कौतुक करत महाराज म्हणाले, "नाचणे अनेकांना जमतं; पण हरिनामाच्या रंगात रंगून

भक्तिभावाने नाचणे हे दुर्मिळ भाग्य आहे." पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अभिष्टचिंतनानिमित्त प्रतापराव पाटील व विक्रम पाटील यांच्या नेतृत्वाखाली जीपीएस मित्र परिवाराने आयोजित केलेला हा हरिनाम महोत्सव समाजाला भक्ती, संस्कार आणि एकात्मतेची प्रेरणा देणारा असल्याचे सांगत त्यांनी आयोजकांचे विशेष अभिनंदन केले. या महोत्सवासाठी पंचक्रोशीतील तब्बल २३ ते २५ गावांमधून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. महोत्सवाची भव्यता, शिस्तबद्ध नियोजन आणि भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण राज्यभर या सोहळ्याची चर्चा रंगू लागली असून पाळधी नगरी सध्या हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेली आहे. सप्ताहासाठी उभारण्यात आलेला सुसज्ज व भव्य सभा मंडप, अत्याधुनिक ध्वनिक्षेपण व्यवस्था, आकर्षक प्रकाशयोजना आणि भव्यदिव्य व्यासपीठ हे विशेष आकर्षण ठरत आहे. एकावेळी पाच हजारांहून अधिक भाविक बसू शकतील अशी व्यवस्था करण्यात आली असून भाविकांसाठी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. महिला, वारकरी, युवक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच पुरुष वर्गाची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभत असून संपूर्ण परिसर विठ्ठलनामाच्या अखंड गजराने दुमदुमून गेला आहे.यावेळी पालकमंत्री मा. ना. गुलाबराव पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच ह.भ.प. गजाननजी महाराज वरसाडेकर, ह.भ.प. गोपाल महाराज डोणगावकर, ह.भ.प. जितेंद्र महाराज डोणगावकर, ह.भ.प. यज्ञेश महाराज माळी, ह.भ.प. मयूर महाराज तरवाडेकर, ह.भ.प. कैलास महाराज पवार, ह.भ.प. परमेश्वर महाराज पाळधीकर, ह.भ.प. निंबा महाराज वाघडूतकर, ह.भ.प. संदीप महाराज झुरखेडेकर व ह.भ.प. गोपाल महाराज दापोरेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

### हरवलेल्या चिमुकलीला मिळवून दिले कुटुंब

दरम्यान, सप्ताहातील गर्दीदरम्यान युवा नेते प्रतापराव पाटील यांच्या संवेदनशीलतेचे हृदयस्पर्शी दर्शन घडले. कार्यक्रमस्थळी गर्दीत हरवून रडत असलेल्या एका चिमुकलीला त्यांनी धीर देत तिच्या पालकांचा शोध सुरू केला. कार्यकर्त्यांच्या मदतीने काही वेळातच मुलीची तिच्या आई-वडिलांशी भेट घडवून आणण्यात यश आले. आपल्या मुलीला सुखरूप पाहून पालकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. या प्रसंगी जीपीएस मित्र परिवाराचे ज्येष्ठ सदस्य प्रशांत झंवर यांनीही मोलाचे सहकार्य केले. या घटनेमुळे प्रतापराव पाटील यांच्या माणुसकीपूर्ण आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वाचे पुन्हा एकदा दर्शन घडल्याची भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली.

Selected

## अकरावी प्रवेशाची पहिली यादी जाहीर

पुणे : राज्यातील अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील पहिल्या नियमित फेरीची निवडयादी शुक्रवारी जाहीर करण्यात आली. या फेरीत राज्यभरातील आठ विभागांमधून महाविद्यालयांचे पसंतिक्रम नोंदवलेल्या विद्यार्थ्यांपैकी ५.७४ लाख विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला. मुंबई विभागातील सर्वाधिक १ लाख ३३ हजार ३२३ विद्यार्थ्यांना, त्याखालोखाल पुणे विभागातील १ लाख ९ हजार ६२३ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी देण्यात आली आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबतची माहिती दिली. राज्यभरात अकरावीच्या ऑनलाइन प्रवेशासाठी एकूण २१ लाख ९८ हजार ६६६ जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी १२ लाख ५१ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदवलेल्या ८ लाख ८७ हजार २६४ विद्यार्थ्यांपैकी ५ लाख ७४ हजार मुंबई विभागात सर्वाधिक ४ लाख ७७ हजार २१० जागांची क्षमता असून २ लाख १२ हजार ९१७ विद्यार्थ्यांनी अर्ज अंतिम केला होता.

# जळगाव विधान परिषद जागा शिवसेना शिंदे गटाच्या वाट्याला?

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या चिरंजीवांचा उमेदवारी अर्ज

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** राज्यातील विधान परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीमध्ये जागावाटपावरून मोठी राजकीय हालचाल सुरू असताना जळगाव विधान परिषद मतदारसंघाबाबत महत्त्वाची माहिती समोर येत आहे. जळगावची जागा शिवसेना शिंदे गटाच्या वाट्याला सोडण्यात आल्याची खात्रीलायक माहिती राजकीय सूत्रांकडून मिळत असून, पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे चिरंजीव तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रताप पाटील यांचे उमेदवारीचे तिकीट जवळपास निश्चित झाल्याची चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे, प्रताप पाटील यांनी आज विधान परिषद निवडणुकीचा अर्ज घेतल्याने त्यांच्या

उमेदवारीच्या चर्चांना आणखी बळ मिळाले आहे. आता फक्त शिवसेना पक्ष आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अधिकृत घोषणेची प्रतीक्षा असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. प्रताप पाटील हे केवळ राजकीय वारसा लाभलेले नाव नसून, स्वतःच्या कार्यशैलीतून जनतेमध्ये स्वतंत्र ओळख निर्माण करणारे युवा नेतृत्व म्हणून पुढे येत आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी, युवक, महिला तसेच स्थानिक कार्यकर्त्यांशी त्यांचा सातत्यपूर्ण संपर्क असल्याने ते सहज उपलब्ध आणि जनतेच्या प्रश्नांवर तत्काळ प्रतिसाद देणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. बारा महिने चोवीस तास जनतेसाठी कार्यरत राहण्याची त्यांची कार्यपद्धती कार्यकर्त्यांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे. सामाजिक बांधिलकी जपत विविध विकासकामांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला असून, त्यामुळे भविष्यातील प्रभावी राजकीय चेहरा म्हणून त्यांच्या नेतृत्वाकडे पाहिले जात आहे. संघटन कौशल्य, शांत आणि संयमी स्वभाव, अभ्यासू वृत्ती तसेच निर्णयक्षम नेतृत्व ही प्रताप पाटील यांची प्रमुख वैशिष्ट्ये मानली जातात. युवा वर्गात वाढती लोकप्रियता आणि महायुतीतील विविध घटक पक्षांशी असलेला समन्वय यामुळे त्यांची उमेदवारी अधिक भक्कम समजली जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अनुभव, मजबूत जनसंपर्क आणि सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सातत्याने असलेली उपस्थिती यामुळे प्रताप पाटील यांनी अल्पावधीतच स्वतःचा स्वतंत्र राजकीय ठसा उमटवला आहे. त्यामुळे आगामी विधान परिषद निवडणुकीत ते महायुतीसाठी सक्षम आणि विजयी उमेदवार ठरू शकतात, अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे. दरम्यान, महायुतीच्या जागावाटपाचा अंतिम निर्णय वरिष्ठ पातळीवर होणार असून, जळगावच्या राजकीय वर्तुळात आता अधिकृत घोषणेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या अधिकृत घोषणेची प्रतीक्षा

प्रताप पाटील यांनी आज विधान परिषद निवडणुकीचा अर्ज घेतल्याने त्यांच्या उमेदवारीच्या चर्चांना आणखी बळ मिळाले आहे. आता फक्त शिवसेना पक्ष आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अधिकृत घोषणेची प्रतीक्षा असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

जन सम्राट टाईम्स विशेष बातमी

## धुळे महापालिकेत नालेसफाईच्या नावाखाली कोट्यवधींची लूट?

### टेंडर प्रक्रियेवर शिवसेनेचे गंभीर आरोप

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** धुळे महानगरपालिकेतील नालेसफाई कामांच्या निविदा प्रक्रियेत मोठा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने केला आहे. नालेसफाईच्या अंदाजपत्रकात अवास्तव वाढ, बेकायदेशीर फेरनिविदा प्रक्रिया आणि अधिकारी-नगरसेवक-ठेकेदार संगनमतातून जनतेच्या पैशांची लूट सुरू असल्याचा आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०२५ पर्यंत नालेसफाईचे काम महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत केले जात होते आणि त्यासाठी साधारण २५ लाख रुपये खर्च होत होते. त्यानंतर हे काम बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आले आणि नालेसफाईचे अंदाजपत्रक थेट ५५ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आले. मात्र यावर्षी परिस्थिती आणखी धक्कादायक असल्याचा आरोप करण्यात आला आहे. २०२६ साठी नालेसफाईचे अंदाजपत्रक तब्बल १ कोटी ४९ लाख ८४ हजार ९६ रुपये मंजूर करण्यात आले. यासाठी काढलेल्या निविदेत समर्थ कन्स्ट्रक्शन कंपनीने सर्वात कमी दर भरला होता. परंतु संबंधित ठेकेदार "सत्ताधाऱ्यांच्या सोयीचा नसल्याने" निविदा खोटे कारण देत रद्द करण्यात आली आणि फेरनिविदा काढण्याचा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, पहिली निविदा १.५० कोटींची असताना फेरनिविदा मात्र थेट २ कोटी ४९ लाख ५८ हजार ५९९ रुपयांची काढण्यात आल्याने संशय अधिकच गडद झाला आहे. "फेरनिविदा प्रक्रियेत तब्बल ७० टक्क्यांनी वाढ कशी झाली?" असा सवाल शिवसेनेकडून उपस्थित करण्यात आला आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## पुणे विद्यापीठात दिगंबर जैन मुनींना प्रवेश नाकारल्याने वाद!

### धार्मिक परंपरा विरुद्ध ड्रेस कोड संघर्ष पेटला

जन सम्राट टाईम्स

**पुणे प्रतिनिधी :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर घडलेल्या एका संवेदनशील घटनेमुळे नवा वाद निर्माण झाला आहे. दिगंबर जैन पंथाचे श्रद्धेय मुनी अक्षय सागरजी महाराज यांना अधिकृत निमंत्रण असूनही त्यांच्या पारंपरिक दिगंबर वेशभूषेमुळे विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावरच अडविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे जैन समाजात तीव्र नाराजी व्यक्त होत असून पुण्यासह राज्यभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, विद्यापीठातील एका प्रमुख शैक्षणिक चर्चासत्रासाठी मुनी अक्षय सागरजी महाराज यांना प्रशासनाकडून निमंत्रित करण्यात आले होते. मात्र ते विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर पोहोचल्यानंतर सुरक्षारक्षकांनी आणि काही अधिकाऱ्यांनी त्यांना प्रवेश नाकारला. "शैक्षणिक परिसरात ड्रेस कोडचे नियम लागू आहेत," असे कारण देत त्यांना आत सोडण्यास नकार देण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

विशेष म्हणजे, निमंत्रण पत्र हातात असूनही मुनींना गेटवरूनच माघारी फिरावे लागल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दिगंबर अवस्था ही जैन धर्मातील सर्वोच्च त्याग, साधना आणि हजारो वर्षांची धार्मिक परंपरा असल्याचे सांगत समाजबांधवांनी विद्यापीठ प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप घेतला आहे. जैन समाजातील विविध संघटना आणि नेत्यांनी या घटनेचा निषेध नोंदवत प्रशासनाला थेट जाब विचारला आहे. "जर विद्यापीठ प्रशासनाला दिगंबर परंपरेची पूर्ण माहिती होती, तर अशा स्थितीत मुनींना

कार्यक्रमासाठी निमंत्रण देण्याची गरज काय होती?" असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. काही कार्यकर्त्यांनी हा प्रकार धार्मिक भावना दुखावणारा आणि जाहीर अपमान असल्याचे म्हटले आहे. या प्रकरणाचे पडसाद आता सोशल मीडियावरही उमटू लागले आहेत. अनेकांनी विद्यापीठाच्या भूमिकेवर टीका करत पुरोगामी विचारांचा वारसा सांगणाऱ्या संस्थेकडून धार्मिक परंपरांचा सन्मान राखला गेला नसल्याचे मत व्यक्त केले आहे. तर काहींनी विद्यापीठाच्या ड्रेस कोड नियमांचे समर्थन करत शैक्षणिक परिसरातील शिस्त आणि नियमांचाही मुद्दा उपस्थित केला आहे.

### विद्यापीठाने जाहीर माफी मागण्याची मागणी

दरम्यान, जैन समाजाने या घटनेबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची तसेच विद्यापीठाने जाहीर माफी मागण्याची मागणी केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणात विद्यापीठ प्रशासन पुढे कोणती भूमिका घेणार, याकडे संपूर्ण शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## पाचोऱ्यात प्रेमीयुगुलाच्याआत्महत्येचा प्रयत्न; अल्पवयीन मुलगी बचावली!

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी :** जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातून एक धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना समोर आली आहे. प्रेमसंबंधातून नैराश्यात गेलेल्या एका तरुणाने आपल्या अल्पवयीन प्रेयसीसोबत आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेत तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला असून फास तुटल्याने अल्पवयीन मुलगी बचावली आहे. या घटनेमुळे पाचोरा परिसरात हळहळ व्यक्त होत असून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करत तपास सुरू केला आहे. ही घटना पाचोऱ्याच्या गोराडखेडे रोडवरील एका लॉजमध्ये गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. रवींद्र संजय मोरे (वय २५, रा. गिरड, ता. भडगाव) असे मृत तरुणाचे नाव आहे. रवींद्र आणि त्याची अल्पवयीन प्रेयसी हे सकाळी सुमारे १० वाजता संबंधित लॉजमध्ये आले होते. काही वेळानंतर दोघांनीही खोलीत गळफास घेऊन जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. माहितीनुसार, दोघांनी पंख्याला फास लावला होता. मात्र,

मुलीच्या बाजूचा फास अचानक तुटल्याने ती खाली पडली आणि तिचा जीव वाचला. मात्र रवींद्रचा फास न तुटल्याने त्याची प्रकृती गंभीर झाली. घाबरलेल्या मुलीने तात्काळ लॉज कर्मचाऱ्यांना माहिती दिली. कर्मचाऱ्यांनी तत्परता दाखवत रवींद्रला जवळच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पाचोरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. तसेच अल्पवयीन मुलीची वैद्यकीय तपासणी आणि समुपदेशनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, रवींद्र मोरे याचा विवाह महिनाभरापूर्वीच ठरला होता आणि लग्न काही दिवसांवर आले होते. मात्र त्याचे प्रेम दुसऱ्या मुलीवर असल्याने तो मानसिक तणावाखाली असल्याची माहिती समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, रवींद्रच्या कुटुंबीयांनी या घटनेबाबत संशय व्यक्त केला आहे. हा केवळ आत्महत्येचा प्रकार नसून घातपात असू शकतो, असा दावा त्यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी कुटुंबीयांनी पोलिसांकडे केली आहे. दरम्यान, या घटनेनंतर अल्पवयीन मुलगी प्रचंड घाबरलेल्या अवस्थेत असून तिने अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. तिचा जबाब नोंदवल्यानंतर या प्रकरणातील अनेक बाबी स्पष्ट होण्याची शक्यता पोलिस सूत्रांनी व्यक्त केली आहे. पाचोरा पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास करत आहेत.

## वाढत्या गुन्हेगारीवरून गृहखात्यावर टीकेची झोड

### अकार्यक्षम कारभारामुळे पुण्यात १८ बळी

जन सम्राट टाईम्स

**पुणे । प्रतिनिधी :** पुण्यात घडलेल्या सलग गंभीर घटनांनंतर राज्यातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, विरोधकांनी थेट राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. पोलिस यंत्रणेतील कथित हफ्तेखोरी, वाढती गुन्हेगारी आणि प्रशासनाचे नियंत्रण सुटल्याचा आरोप करत विरोधी पक्षांनी गृहखात्याच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. विरोधकांकडून करण्यात आलेल्या टीकेत म्हटले आहे की, पुण्यातील अलीकडच्या घटनांमध्ये निष्पाप नागरिकांचे बळी जात असताना पोलिस यंत्रणा प्रभावीपणे परिस्थिती हाताळण्यात अपयशी ठरत आहे. "जर या घटना हत्या असल्याचे सरकार मान्य करत असेल, तर मग भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अंतर्गत गुन्हे कोणावर दाखल करणार?" असा सवाल उपस्थित करत विरोधकांनी थेट सरकारलाच जबाबदार धरले आहे. राजकीय वर्तुळात अशीही चर्चा रंगली आहे की, पुण्यातील कायदा-सुव्यवस्थेवर राज्य सरकारचा वचक कमी होत चालला असून, पोलिस दलावर नियंत्रण ठेवण्यात गृहखात्याला अपयश येत आहे. "पुणे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत आहे," असा आरोप काही विरोधी नेत्यांनी केला आहे. दरम्यान, "अजितदादा यांच्या निधनानंतर पुणे पोरके झाल्यासारखे वाटत आहे," अशा भावनिक प्रतिक्रिया देखील काही राजकीय व सामाजिक स्तरातून उमटत असल्याचे बोलले जात आहे. शहरातील वाढत्या गुन्हेगारीमुळे व्यापारी, विद्यार्थी, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. विरोधकांनी राज्य सरकारकडे पुण्यातील गुन्हेगारी घटनांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली असून, पोलिस प्रशासनातील कथित भ्रष्टाचारावर कठोर कारवाई करण्याची मागणीही पुढे आली आहे. यावर आता गृहखाते आणि राज्य सरकार कोणती भूमिका घेते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## निगडी-पिंपरी मेट्रो स्टेशन थांब्याबाबत आक्षेप!

### बिल्डरला फायदा करण्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स

**पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी:** निगडी ते पिंपरी मेट्रो रेल्वे प्रकल्पातील प्रस्तावित स्टेशन थांब्यावरून नव्या वादाला तोंड फुटले आहे. मुंबई-पुणे महामार्गावरील निगडी सिग्नल परिसरात फॉरमायका कंपनीच्या जागेवर सुरू असलेल्या नव्या बांधकाम प्रकल्पाला फायदा करून देण्यासाठीच मेट्रो स्टेशन थांबा मुद्दाम त्या ठिकाणी घेण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी अधिकृत आक्षेप नोंदवत संबंधित काम तात्काळ थांबवण्याची मागणी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निगडी ते पिंपरी मेट्रो रेल्वे मार्गाचे काम सध्या वेगाने सुरू असून निगडी सिग्नलच्या डाव्या बाजूस असलेल्या फॉरमायका कंपनीच्या जागेवर एका खासगी बिल्डरकडून मोठ्या इमारत प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. याच प्रकल्पाच्या कॉर्नरवर मेट्रो स्टेशन थांबा उभारण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे भविष्यात संबंधित बिल्डरला व्यापारी आणि आर्थिक लाभ मिळावा यासाठीच हा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. सचिन काळभोर यांनी म्हटले आहे की, निगडी बस स्टॉप हा आधीपासूनच मुंबई-पुणे महामार्गावरील मुख्य वाहतूक केंद्र असून नियोजित मेट्रो स्टेशन थांबा याच ठिकाणी असणे अपेक्षित होते. मात्र अचानक दुसऱ्या ठिकाणी स्टेशन थांबा नेण्यात आल्याने संशय निर्माण झाला आहे.

त्यांनी आरोप केला की, नियोजित स्ट्रक्चर प्लॅनमध्ये नसलेला हा मेट्रो स्टेशन थांबा राजकीय दबाव आणि आर्थिक तडजोडीतून मंजूर करण्यात आला आहे. यासंदर्भात मेट्रो रेल्वे प्रकल्प अधिकाऱ्यांकडे अधिकृत आक्षेप दाखल करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन निगडी ते पिंपरी मेट्रो स्टेशन थांब्याचे सुरू असलेले काम थांबवावे, तसेच संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या आरोपांमुळे निगडी-पिंपरी मेट्रो प्रकल्पाबाबत शहरात चर्चांना उधाण आले असून मेट्रो प्रशासन आणि संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांची भूमिका काय असणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## अवैध कत्तल खान्यावर छापा, ९ आरोपी अटकेत

### १२ लाखांचा मुद्देमाल जप्त

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद| प्रतिनिधी :** येथील फातेमानगर परिसरात सुरू असलेल्या अवैध गोवंश कत्तल प्रकरणावर नशिराबाद पोलिसांनी मोठी धडक कारवाई करत ९ आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल १२ लाख २० हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २८ मे २०२६ रोजी नशिराबाद पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे या आपल्या पथकासह परिसरात गस्त घालत होत्या. त्यावेळी त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, फातेमानगरमधील ३६ खोली परिसरात काही इसम अवैधरित्या गोवंश कत्तलीचा व्यवसाय करत आहेत. माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करून संबंधित ठिकाणी अचानक छापा टाकण्यात आला. या कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून ३ गायी, १ बैल, ९ गोऱ्हे आणि २ लहान वासरे अशी जनावरे ताब्यात घेतली. तसेच सुमारे २०० किलो गोमांस, कत्तलीसाठी वापरण्यात येणारे चाकू, सत्तूर आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले वाहनही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी नासिर शहा दिलावर शहा (वय ४१), शब्बीर शहा दिलावर शहा (वय ३२), अबरार शेख अन्सार मन्यार (वय २६), शेख रफीक शेख इसाक (वय ३८), अकबर सत्तार खाटीक (वय ४९), आदील शरिफ चौधरी (वय ३४), सोहेल शरिफ चौधरी (वय ३०), परवीन मुक्तार कुरेशी (वय ३५) आणि मुक्तार जमाल कुरेशी (वय ४०) या नऊ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सर्व आरोपी हे फातेमानगर व रामनगर एमआयडीसी परिसरातील रहिवासी असल्याचे पोलिसांनी सांगितले. या सर्व आरोपींविरुद्ध नशिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १७२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३२५, २७५ तसेच महाराष्ट्र प्राणीसंवर्धन अधिनियम कलम ५, ५(क), ९ आणि ९(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक हरेष पाटील करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित आणि उपविभागीय पोलीस अधिकारी केदार बारोले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक रविंद्र तायडे, हरेष पाटील, सहाय्यक फौजदार शरद सोनार, राजेश मेंढे तसेच पोलीस अंमलदार चंद्रकांत पाटील, गुणवंत देशमुख, प्रशांत विरनारे, कमलाकर बागुल, भारत बाविस्कर, पंकज सोनवणे, विठ्ठल मुंडे, सागर बिडे, विजय अहिरे, भूषण पाटील आणि रामकृष्ण माळी यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली.

### 12 लाख 20 हजार 900 रुपयांचा मुद्देमाल जप्त

गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, काही इसम अवैधरित्या गोवंश कत्तलीचा व्यवसाय करत आहेत. माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करून संबंधित ठिकाणी अचानक छापा टाकण्यात आला.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## कलीयुगातून तरण्यासाठी भगवंताचे नाम हेच सर्वश्रेष्ठ साधन : ह.भ.प. रामेश्वर महाराज

### पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अभिष्टचिंतनानिमित्त अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताह

जन सम्राट टाईम्स

**पाळधी / धरणगाव । प्रतिनिधी :** राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अभिष्टचिंतनानिमित्त पाळधी येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहास अत्यंत भक्तिमय वातावरणात उत्साहपूर्ण प्रारंभ झाला. जीपीएस ग्रुप तसेच युवा नेते आणि जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील व विक्रम पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी हजारो भाविकांनी उपस्थित राहून हरिनामाचा लाभ घेतला. "कलीयुगातून तरून जाण्यासाठी भगवंताचे नाम हेच सर्वश्रेष्ठ साधन आहे," असे मार्मिक प्रतिपादन ह.भ.प. रामेश्वर महाराज पाळधीकर यांनी आपल्या रसाळ आणि प्रभावी कीर्तनातून केले. नामस्मरणामुळे मन शुद्ध होते, जीवनाला योग्य दिशा मिळते आणि भगवंताशी नाते दृढ होते, असे सांगताना त्यांनी संत साहित्य, अभंग आणि संतवचनांच्या माध्यमातून नामभक्तीचे महत्त्व अत्यंत प्रभावीपणे उलगडून सांगितले. त्यांच्या ओघवत्या वाणीला उपस्थित भाविकांनी टाळ-मृदंगाच्या गजरात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विठ्ठलनामाच्या अखंड जयघोषाने संपूर्ण परिसर

भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. कीर्तनादरम्यान अनेक भाविक भावविव्हळ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. या सप्ताहासाठी उभारण्यात आलेला भव्य मंडप, आधुनिक ध्वनी व्यवस्था, आकर्षक व भव्यदिव्य व्यासपीठ तसेच भाविकांसाठी करण्यात आलेल्या विविध सुखसोयी हे विशेष आकर्षण ठरत आहेत. एकावेळी तब्बल पाच हजारांहून अधिक भाविक बसू शकतील अशी प्रशस्त व्यवस्था करण्यात आली असून, संपूर्ण परिसरात अध्यात्म, संतविचार आणि भक्तीचा जागर अनुभवायला मिळत आहे. या भक्तिमय सोहळ्यास ह.भ.प. ईश्वरलाल महाराज पाळधीकर, ह.भ.प. गजानन महाराज वरसाडेकर, ह.भ.प. गोपाल महाराज दोनगावकर, ह.भ.प. यज्ञेश महाराज आळंदीकर, ह.भ.प. मयूर महाराज तसेच ह.भ.प. परमेश्वर महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभली. टाळ-मृदंगाच्या निनादात आणि विठ्ठलनामाच्या अखंड गजरात सप्ताहाच्या पहिल्या दिवसाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. या अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहामुळे पाळधीसह संपूर्ण पंचक्रोशीत भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, आगामी दिवसांतही मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार असल्याचे चित्र आहे.

### अध्यात्म, संतविचार आणि भक्तीचा जागर

कीर्तनादरम्यान अनेक भाविक भावविव्हळ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. या सप्ताहासाठी उभारण्यात आलेला भव्य मंडप, आधुनिक ध्वनी व्यवस्था, आकर्षक व भव्यदिव्य व्यासपीठ तसेच भाविकांसाठी करण्यात आलेल्या विविध सुखसोयी हे विशेष आकर्षण ठरत आहेत. एकावेळी तब्बल पाच हजारांहून अधिक भाविक बसू शकतील अशी प्रशस्त व्यवस्था करण्यात आली असून, संपूर्ण परिसरात अध्यात्म, संतविचार आणि भक्तीचा जागर अनुभवायला मिळत आहे.